# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

प्रीतिसंगम

# बी.डी. कॉलेज विस्तारित इमारतीचा मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ

पाटण/प्रतिनिधी:–एस.मोहिते-

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बी.डी.कॉलेज पाटण येथे विविध नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या नवीन अद्ययावत संगणक प्रयोगशाळा आणि विस्तारित इमारतीचा उद्घाटन समारंभ गुरुवार दि. ९ रोजी दुपारी २.३० वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ना.चंद्रकांतदादा पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. अतुलबाबा भोसले तसेच पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर व मान्यवरांच्या उपस्थितीत यांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी.पवार यांनी दिली.



यावेळी प्राचार्य एस.डी. पवार यांनी सांगितले की, पाटण तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये मिळणाऱ्या उच्च शिक्षणाच्या सुविधा आपल्या येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हाव्यात, या दूरदृष्टीकोनातून विविध नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. या नवीन अभ्यासक्रमांमध्ये बी. कॉम.आय.टी., बी.सी.ए., बी. एससी. (कॉम्प्युटर सायन्स -इंटायर), एम. कॉम. आय.टी., एम.के.सी.एल. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांचा समावेश असून, यामार्फत विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, संगणक साक्षरता, तसेच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करता येणार आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने नव्याने उभारण्यात आलेल्या अद्ययावत संगणक प्रयोगशाळा आणि विस्तारित इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण तसेच मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.